“हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा ऐतिहासिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

अनुराधा बस्वराज महाजन

एम.ए., बी.एड., सेट (इतिहास)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सूर्यकांत दिगंबर सावंत

एम.ए., नेट, पीएचडी. (इतिहास)

इतिहास विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय, सेलू जि.परभणी

सप्टेंबर २०२२

हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा ऐतिहासिक अभ्यास

प्रस्तावना

प्रसारमाध्यमे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहेत. राज्यकर्त्यांवर प्रभावी अंकुश ठेवणारे साधन प्रसारमाध्यमे आज आपणास सभोवताली घडणाऱ्या घटनांशी अवगत करतातच पण प्रसंगी राज्यकर्त्यांनाही धारेवर धरतात. स्वातंत्र्यापूर्वी आधुनिकीकरणातील या अहिंसक शस्त्राचे सामर्थ्य स्वातंत्र्यलढ्यातील सर्वच नेत्यांनी ओळखले होते. म्हणूनच 'द बेंगाल गॅझेट' या पहिल्या इंग्रजी वृत्तपत्राच्या आरंभानंतर भारतातील प्रबोधनाच्या पहिल्या चळवळीपासून सामाजिक, धार्मिक चळवळी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची आंदोलने, क्रांतिकारकांच्या चळवळी यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रसारमाध्यमांचा वापर करण्यात आला. अगदी प्रत्येक भारतीय नेता क्रांतिकारक समाज सुधारक यांनी वृत्तपत्रे काढली. यातच या प्रसारमाध्यमांचे महत्त्व बिंबले आहे.

भारतीय प्रसारमाध्यमांचा विचार करता मध्ययुगात संत साहित्याने राजकीय बाबींवर आपल्या साहित्यातून केलेले लिखाण आढळतेच. सोबतच तत्कालीन परकीय प्रवाशांनी प्रसारमाध्यमांची भूमिका आपल्या प्रवास वर्णनातून मांडली होतीच. आधुनिक काळात ब्रिटिशांच्या आगमनानंतर प्रसारमाध्यमांची सुरुवात झाली.

स्वातंत्र्यापूर्वी संपूर्ण भारतात ५६३ संस्थाने होती. या संस्थानाचा राज्यकारभार देशी राजे-संस्थानिक करत होते. दक्षिण भारतात नागपूर, कोल्हापूर, बडोदा, त्रावणकोर, हैदराबाद ही देशी राज्ये व संस्थानिक होती. मोगलांच्या दक्षिणेतील सुभेदार मीर कमरुद्दीन निजाम-उल-मुल्क याने ३१ जुलै १७२४ ला भागानगरला हैदराबाद संस्थानाची निर्मिती केली. त्याचे घराणे आसफिया घराणे म्हणून ओळखले जात होते. इ.स.१७२४

ते १९४८ पर्यंत जवळ-जवळ सव्वादोनशे वर्षे या घराण्यांनी राज्य केले. निजामाच्या संस्थानात मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटक अशा बहुभाषिक प्रांताचा समावेश होतो. या प्रांताचे क्षेत्रफळ ८२६१८ चौरस मैल होते. अशा भारतातील बलाढ्य संस्थानातील प्रसारमाध्यमांचा इतिहास पाहता पहिली उर्दू पत्रिका १८५७ मध्ये 'रिसाला-ए-तबाबत' होती. तर १८६० मध्ये 'खुर्शीद-ए-डेक्कन', 'सुभा-ए-डेक्कन' आणि 'निजाम गॅझेट' ही महत्त्वपूर्ण वर्तमानपत्रे तर 'कुर्शीद-ए-डेक्कन', 'हजारे दास्तान', 'अफसरूल अखबर', 'अकबर-ए-असफी', 'मुशीर-ए-डेक्कन', 'इल्म-वो-अमल' इत्यादी अग्रणी उर्दू पत्रिका होत्या. हैदराबाद संस्थानातून प्रकाशित होणारी पहिली तेलुगु पत्रिका 'संध्या चंद्रिका' होती. याचे प्रकाशन १८८६ पासून सुरू होते. हैदराबादमधून प्रकाशित होणारे पहिले वर्तमानपत्र 'गोलगोंडा' हे होते. याची सुरुवात १९२६ मध्ये सुरवरम प्रताप रेड्डींनी केली होती. गोवळकोंडा हे तत्कालीन प्रभावशाली वर्तमानपत्र होते. ३ फेब्रुवारी १९३५ मध्ये हैदराबाद संस्थानात डेक्कन रेडिओ या नावाने पहिल्या रेडिओ स्टेशनची सुरुवात झाली. या रेडिओवरील कार्यक्रम उर्दू भाषेत प्रसारित करण्यात येत असत. हे रेडिओ स्टेशन चिराग अली लेन, एबिडस हैदराबदमध्ये स्थित होते. मीर उस्मान अली खान, आसफजाह-VII ने डेक्कन रेडिओवर कब्जा केला आणि त्याचे राष्ट्रीयकरण केले. त्यानंतर मार्कोनी कंपनीने ते विकत घेतले. १ एप्रिल १९५० रोजी डेक्कन रेडिओला भारत सरकारने ताब्यात घेतले. पुढे १९५६ मध्ये या रेडिओला ऑल इंडिया रेडिओ नाव देण्यात आले. तत्कालीन हैदराबाद संस्थानात डेक्कन रेडिओला निजाम रेडिओ म्हणून ओळखले जात असे. याशिवाय इतरही अनेक प्रसारमाध्यमे अस्तित्वात होते. यावरून हे स्पष्ट होते की हैदराबाद संस्थानात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची असलेली दिसून येते. प्रस्तुत संशोधनात या प्रसारमाध्यमांचा उदय, विकास व प्रसारमाध्यमांचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, प्रशासकीय जीवनावर पडलेला प्रभाव त्यातून झालेले लोकजागृती, संस्थानाचा विकास व प्रसारमाध्यमांचा ऐतिहासिके अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन विषयाची निवड

एकंदरीत प्रसार माध्यमांचा उदय व विकास आणि त्यांचा समाज जीवनावर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी हैदराबाद संस्थानातील सर्व प्रसार माध्यमे व त्यांचा संस्थानातील घटकांवर पडलेला प्रभाव यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

भारतात हैदराबाद संस्थान होते. या संस्थानाचे महत्त्व मध्ययुगीन व आधुनिक काळात होते. निजामाची राजवट ही अत्यंत जुलमी राजवट होती. तत्कालीन निजाम राजवटीत प्रसार माध्यमांचा विकास झाला होता पण हा विषय दुर्लक्षित होता. या दुर्लक्षित विषयावर ऐतिहासिकदृष्ट्या कालसुसंगत अभ्यास करणे आणि वर्तमान जीवनातील प्रस्तुत विषयाची मूल्यात्मकता अभ्यासण्यासाठी संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने काही उद्दिष्टांची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

१) हैदराबाद संस्थानातील प्रसार माध्यमांची पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांच्या प्रकारांचा अभ्यास करणे.

३) हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचे वर्गीकरण अभ्यासणे.

४) हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा संस्थानावरील सामाजिक व आर्थिक प्रभाव अभ्यासणे.

५)	हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा राजकारणावर व प्रशासनावरील प्रभाव अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आलेली आहेत.

१)	हैदराबाद संस्थानात प्रसारमाध्यमांचा उदय झाला होता.

२)	हैदराबाद संस्थानात विविध भाषिक प्रसारमाध्यमे होती.

३)	हैदराबाद संस्थानात आधुनिक प्रसारमाध्यम म्हणून रेडिओची सुरुवात झाली होती.

४)	हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा स्वातंत्र्यलढ्यातील लोकांवर प्रभाव दिसून येतो.

५)	हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा हैदराबाद मुक्तिसंग्रामात मोलाचा वाटा आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीवर आधारित असणार आहे. यात जुन्या तथ्यांचे परीक्षण आणि चिकित्सा विश्लेषणात्मक पद्धतीने करून संशोधनाची मांडणी करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये ऐतिहासिक संदर्भ पद्धती, सर्वेक्षण पद्धती, मुलाखत पद्धती इत्यादी पद्धतींचा वापर करून माहिती संकलित करण्यात येणार आहे. तसेच द्वितीय सामुग्रीमध्ये विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित-अप्रकाशित अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, इंटरनेटवरील विविध संकेतस्थळावरील माहिती यांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती

भारतातील अनेक संस्थांनापैकी हैदराबाद हे एक संस्थान होते. त्याची कार्यपद्धती इतर संस्थांनापेक्षा वेगळी होती. या संस्थानात ब्रिटिशांच्या भारतातील सुधारकानुसार वेगवेगळ्या सुधारणा झाल्या होत्या. त्यातीलच प्रसारमाध्यमे हे सुद्धा हैदराबाद संस्थानातील आली होती. त्याचा प्रभाव संस्थानावर व लोकांवर पडत होता म्हणून हा विषय संशोधनास घेतलेला आहे.

संशोधनाची मर्यादा

हैदराबाद संस्थानावर ऐतिहासिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि मुक्तीसंग्रामाच्या अंगाने अभ्यास झालेला आहे. परंतु या संशोधनात संस्थानातील प्रसार माध्यमांचा अभ्यास करता येणार आहे ही संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

पूर्वलिखीत साहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनेक बाजूंवर लिखाण झालेले असून ते उपलब्ध आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येतो.

१) काटे पी.व्ही. यांनी ‘मराठवाड्याचा इतिहास’ या ग्रंथात हैदराबाद संस्थानाविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे.

२) प्रा.डॉ.प्रशांत देशमुख यांच्या ‘हैदराबाद मुक्तीसंग्रामातील मराठी वर्तमानपत्रे’ या अप्रकाशित शोधप्रबंधात तत्कालीन हैदराबाद संस्थान आणि इतर प्रसारमाध्यमांची माहिती मिळते.

३) कठारे अनिल यांच्या ‘हैदराबाद राज्याचा इतिहास’ या ग्रंथात हैदराबाद संस्थान, सर्व निजाम, तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीची माहिती मिळते.

४) भालेराव अनंत यांच्या ‘स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा’ या ग्रंथात हैदराबादच्या निजामाने केलेले अन्याय अत्याचार व निजामाच्या विरोधातील लढा यात प्रसारमाध्यमांची भूमिका याविषयी माहिती मिळते.

५) मुहमद अशरफ टी. यांनी ‘उर्दू प्रेस’ यावर शोधनिबंध प्रकाशित केला आहे.

६) मु.सी. टी.व्ही. डॉ.मसुद जाफरी १९ सप्टेंबर २०१७ ॲक्शन ऑफ हैदराबाद इंडियन युनियन इन १९४८ या ग्रंथात हैदराबाद इंडियन युनियन विषयी १९४८ पर्यंतची सविस्तर माहिती मिळते.

७) के.एन. मुन्सी यांनी ‘एन्ड ऑफ एरा’ या ग्रंथात तत्कालीन हैदराबाद संस्थानची राजकीय परिस्थिती तसेच निजामाची जुलमी राजवट संपुष्टात आलेल्या घटनेपर्यंत केलेल्या वर्णनाची माहिती मिळते.

८) माईक थॉमसन यांनी ‘हैदराबाद मसाकर बी.बी.सी. साऊंड’ यातून तत्कालीन संस्थानातील प्रसारमाध्यमे आणि त्यांचा वाढता प्रभाव अभ्यासला आहे.

या याशिवाय अनेक संशोधकांनी हैदराबाद संस्थानावर ग्रंथ आणि शोधप्रबंधाचे लेखन केले आहे. याशिवाय प्रस्तुत विषयसंदर्भातील शासकीय कागदपत्रे, मुद्रित प्रसारमाध्यमांचे प्रकाशित अप्रकाशित अंकही उपलब्ध आहेत ज्यांचा उपयोग प्रस्तुत संशोधनाकरिता होणार आहे.

प्रकरण मांडणी

प्रस्तुत शोधप्रबंधाची एकूण सहा प्रकरणांमध्ये मांडणी करण्यात येणार असून ती खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले- हैदराबाद संस्थानची भौगोलिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन हैदराबाद संस्थानची स्थापना, भौगोलिक रचना, संस्थानची राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमे : उदय आणि वाटचाल

प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन हैदराबाद संस्थानातील विविध प्रसार माध्यमे आणि त्यांच्या उदय व वाटचालीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - हैदराबाद संस्थानातील प्रसार माध्यमांचे प्रकार व त्यांचे वर्गीकरण

प्रस्तुत प्रकरणात हैदराबाद संस्थानातील विविध प्रसारमाध्यमांचे प्रकार आणि त्या प्रकाराचे वर्गीकरण करण्यात येईल.

प्रकरण चौथे - हैदराबाद संस्थानातील प्रसार माध्यमांचा संस्थानातील सामाजिक आणि आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव

प्रस्तुत प्रकरणात हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा सामाजिक, आर्थिक जीवनावर पडलेला होता आणि त्यातून संस्थानाची भूमिका व त्याचबरोबर संस्थानाने प्रसारमाध्यमासाठी कोणती भूमिका घेतली याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा संस्थानावरील राजकीय आणि प्रशासकीय जीवनावरील पडलेला प्रभाव

प्रस्तुत प्रकरणात हैदराबाद संस्थानातील प्रसारमाध्यमांचा संस्थानावरील राजकीय व प्रशासकीय जीवनावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करण्यात येणार आहे व संशोधनाअंती निकर्षापर्यंत पोहचणार आहे.

प्रकरण सहावे – निष्कर्ष

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात येतील. शेवटी संदर्भ ग्रंथसूची व परिशिष्ट्ये जोडण्यात येतील.

संदर्भ

१) कठारे अनिल, हैदराबाद राज्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००५

२) काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९

३) भालेराव-धारूरकर-शुभदा, हैदराबाद मुक्तिसंग्रामात महिलांचा सहभाग, समर्थ नगर, औरंगाबाद, २००१

४) सिद्दीकी एन.ए., मोगकालीन महसूल पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६

५) आसफजाही खंड १, संपादक सरफराज अहमद, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१९

६) आर.एन. सिंग, युनिफायर ऑफ मॉडर्न इंडिया, वितास्ता पब्लिशिंग, २०१८

७) के.एन. मुन्शी, एन्ड ऑफ एरा, भारतीय विद्या भवन, मुंबई, १९५६

८) पी.व्ही. मेनन, दि स्टोरी ऑफ इंडिय्न स्टेटस ओरिएंटल लाँगमन, कलकत्ता, १९५६

९) रफिक झकेरिया, सरदार पटेल आणि मुसलमान, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९१८

१०) मु.सी.टी.व्ही. डॉ.मसुद जाफरी, १९ सप्टेंबर २०१७, ॲक्शन ऑफ हैदराबाद इंडियन युनियन इन १९४८

११) माईक थॉमसन, दि हैदराबाद मसाकर बी.बी.सी. साऊंड सप्टेंबर २०१३

१२) ए.जी. नुराणी पटेल, कम्युनॅलिझम, फ्रंटलाईन, १३ सप्टेंबर २०१३

१३) वाघमारे ए.के., एज्युकेशन इन हैदराबाद, आर्यभूषण मुद्रणालय, पुणे, १९४८

१४) कुरुंदकर नरहर, हैदराबाद विमोन व विसर्जन, रजत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

१५) हुसेन मझर सी.आय., १९४१, गव्हर्नमेंट प्रेस, हैदराबाद

१६) रिझवी एम.एम., दि क्रोनोलॉजी ऑफ हैदराबाद स्टेट, मान पब्लिकेशन, हैदराबाद, १९९७

इंग्रजी

1) The Quarterly Review of Historical Studies, Editor N.R. Ray, Institute of Hisotircal Studies, Calcutta, Vol.XX, 1940-81

2) Regani Sarojini, Nizams British Relations 1724-1857, Concept Publishing Company, New Delhi-110059
3) Dr.Ramesan N. (Edi.), Journal of the Andhra Pradesh State, Archieve (India), Itihas, July to December 1979, Vol. VII, Director General of Archieve Government of Andhra Pradesh, Hyderabad-500007 (India, 1979)
4) Vaikuntham Y., Studies in Socio-economic and Political History, Hyderabad State, 2004
5) Reddy, Ramkrishna V., Economic History of Hyderabad State, Gian Publishers, 1987

गॅझेटिअर

१) पाठक अरुणचंद्र (संपा.), औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६
२) पाठक अरुणचंद्र (संपा.), नांदेड जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६
३) कुंठे बी.जी. (संपा.), उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर, मुंबई, १९७२
४) Imperial Gazetteer of India, Provincial Series, Hyderabad State, Superintendent of Geovernment Prining, Calcutta, 1991

संशोधक ***मार्गदर्शक***

अनुराधा बस्वराज महाजन

प्रा.डॉ.सूर्यकांत दिगंबर सावंत
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर